अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | शनिवार, दि. ४ नोव्हेंबर २०२३ | वर्ष : २२ वे | अंक : ३७ वा | किंमत : ५ रुपये | पाने ८

## अफगाणिस्तानची विजयी हॅट्ट्रीक

**लखनौ** : अफगाणिस्तानने विश्वचषक २०२३ च्या ३४व्या सामन्यात नेदरलँड्सचा % गडी राखून पराभव करून स्पर्धेतील चौथा विजय नोंदवला. या विजयानंतर अफगाणिस्तान टीमला त्यांच्या क्रिकेट इतिहासातील सर्वात मोठं रिटर्न गिफ्ट मिळालं आहे.

अफगाणिस्तान टीम पुढील वर्षी पाकिस्तानात होत असलेल्या चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी पात्र ठरली आहे. त्यामुळे अफगाण क्रिकेटमध्ये हा मैलाचा दगड गाठला गेला आहे. पाकिस्तानमध्ये होणाऱ्या चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी टीम इंडिया, साऊथ आफ्रिका, न्यूझीलंड, अफगाणिस्तान आणि पाकिस्तान पात्र ठरला आहे. दुसरीकडे, अफगाणिस्तानचा चौथा विजय हा चौथ्या क्रमांकावर असलेल्या न्यूझीलंड आणि आधीच खराब स्थितीत असलेल्या पाकिस्तानसाठी मोठा धक्का ठरू शकतो. अफगाण संघाच्या विजयानंतर उपांत्य फेरीच्या शर्यतीत रंजक वळण येऊ शकते. न्यूझीलंड आणि पाकिस्तानसाठी डोकेदुखी होऊ शकते. अफगाणिस्तानने नेदरलँडचा पराभव करून न्यूझीलंडशी गुणांची बरोबरी केली आहे. दोन्ही संघांनी ७-७ सामन्यांनंतर चार विजय मिळवले आहेत. मात्र, निव्वळ धावगतीच्या फरकामुळे अफगाणिस्तान पाचव्या स्थानावर एक स्थानाने खाली आहे. न्यूझीलंड चौथ्या क्रमांकावर आहे. याशिवाय पाकिस्तान सहाव्या क्रमांकावर आहे. अशा स्थितीत अफगाणिस्तान आपले दोन्ही सामने जिंकून पाकिस्तानला उपांत्य फेरीच्या शर्यतीतून पूर्णपणे संपुष्टात आणू शकतो.




## नो टेन्शन...

# उजनीमैय्या तहान भागवणार!


- उजनी प्रकल्पातून आजपासून पाणी सोडण्याचा निर्णय
- सोलापूर शहरासाठी भीमा नदीतून ५ टीएमसी पाणी सोडण्यात येणार
- पाणी सोडल्यानंतर परिसरातील वीज खंडित करणार
- उजनीत २ नोव्हेंबर अखेर २९.३३ टीएमसी पाणीसाठा उपलब्ध
- रब्बी हंगाम २०२३-२४ साठी ३.१६ टीएमसी पाणी
- उर्वरित रब्बी हंगामासाठी ४४.२७ टीएमसी पाणी सोडण्यात येणार

सुराज्य/सोलापूर

अवर्षण स्थितीमुळे सोलापूरसह जिल्ह्यावरील संभाव्य पाणी टंचाई लक्षात घेवून सोलापूरचे पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी ठोस पाऊल उचलले आहे. शुक्रवारी मंत्रालयात त्यांनी कालवा सल्लागार समितीची बैठक घेतली. त्यात फेब्रुवारी २०२४ पर्यंत उजनी धरणातील पाणी वाटपाचे नियोजन निश्चित केले. भीमा नदी आवर्तन (सोलापूर शहरासाठी) १ डिसेंबर २०२३ ते १० डिसेंबर २०२३ या कालावधीत ५ टीएमसी तर भीमा नदी आवर्तन (सोलापूर शहरासाठी हिळ्ळी कोल्हापूर पद्धतीचा बंधाऱ्यापर्यंत १ फेब्रुवारी २०२४ ते १० फेब्रुवारी २०२४ या कालावधीत ६ टीएमसी पाणी सोडण्यात येणार आहे.त्यामुळे उजनीमैय्या सोलापूरसह जिल्ह्याची तहान भागवणार आहे.वेळीच नियोजन केल्यामुळे सोलापूरकरांची काळजी मिटली आहे.

सोलापूर लाभक्षेत्र विकास प्राधिकरण अंतर्गत उजनी प्रकल्पात दिनांक २ नोव्हेंबर २०२३ अखेर २९.३३ उपयुक्त पाणीसाठा तर ६३.६६ मृत पाणीसाठा असा एकूण ९२.९९ टीएमसी पाणीसाठा उपलब्ध आहे. या उपलब्ध पाणी साठ्यातून रब्बीचे व पिण्याच्या पाण्याचे दोन आवर्तन माहे फेब्रुवारी २०२४ अखेरपर्यंत पुरेसा राहील या पद्धतीने पाणी सोडण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती उच्च व तंत्र शिक्षण मंत्री तथा पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी बैठकीनंतर दिली. उजनी प्रकल्पातील उपलब्ध पाण्याच्या नियोजनाबाबत कालवा सल्लागार समितीच्या दूरदृश्यप्रणाली द्वारे आयोजित बैठकीत तेबोलत होते.

यावेळी आमदार सर्वश्री बबनदादा शिंदे, संजयमामा शिंदे, समाधान आवताडे, सुभाष देशमुख, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील हे दूरदृश्य प्रणाली द्वारे उपस्थित होते तर जिल्हाधिकारी कार्यालय येथून जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे, उपजिल्हाधिकारी महसूल विठ्ठल उदमले, जलसंपदाचे अधीक्षक अभियंता धीरज साळे, कार्यकारी संचालक कोल्हे, उजनी धरण व्यवस्थापन प्रकल्पाचे मोरे, भीमा कालवा मंडळाचे अधीक्षक अभियंता बागडे यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते. पाटील यांनी सांगितले की, जलसंपदा विभागाने रब्बी हंगाम २०२३-२४ व पिण्याच्या पाण्यासाठी उजनी प्रकल्पातून दिनांक ४ नोव्हेंबर २०२३ पासून पाणी सोडणेबाबत नियोजन केले असून त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, पाण्याचा अपव्यय होणार नाही यासाठी योग्य ती दक्षता घ्यावी. त्याचप्रमाणे पाणी सोडल्यानंतर आजूबाजूच्या परिसरातील वीज खंडित करावी जेणेकरून शेवटच्या ठिकाणापर्यंत पाणी पोहोचेल असेही त्यांनी सांगितले. तसेच हे पाणी आवर्तन सोडण्याचे नियोजन माहे फेब्रुवारी २०२४ अखेरपर्यंतचे असून त्यानंतरचे पाणी नियोजन कशा पद्धतीने करावयाचे याबाबत जानेवारी अखेरपर्यंत कालवा समितीची पुन्हा बैठक घेण्यात येईल.





**खरीप हंगाम २०२३-२४ मधील पाणी वापर :** खरीप हंगाम २०२३-२४ मधील प्रत्यक्ष पाणी वापर जलाशयाच्या वरील बाजूचा पाणी वापर ६.६४ खालील बाजूचा पाणी वापर ५.४५ टीएमसी असा एकूण १२.०९ टीएमसी पाणी वापर झालेला आहे.

**रब्बी हंगाम २०२३-२४ मधील प्रत्यक्ष पाणी वापर :** रब्बी हंगाम २०२३-२४ मधील दिनांक २ नोव्हेंबर २०२३ पर्यंतचा प्रत्यक्ष पाणी वापर हा जलाशयाच्या वरील बाजूचा २.६० टीएमसी तर जलाशयाच्या खालील बाजूचा ०.५६ टीएमसी असा एकूण ३.१६ टीएमसी झालेला आहे.

**उर्वरित रब्बी हंगाम २०२३-२४ चे पाणी नियोजन :** २ नोव्हेंबर २०२३ रोजी उजनी प्रकल्पातील पाण्याची पातळी ४९४.५८० मीटर इतकी आहे तर एकूण पाणीसाठा ९२.९९ टीएमसी, उपयुक्त पाणीसाठा २९.३३ टीएमसी तर उपयुक्त पाणी साठेची टक्केवारी ५४.७५ टक्के आहे, अशी माहिती प्रकल्पाचे अध्यक्ष अभियंता धीरज साळी यांनी दिली. उजनी प्रकल्पातून दिनांक २ नोव्हेंबर २०२३ ते २९ फेब्रुवारी २०२४ या कालावधीत जलाशयाच्या वरील बाजूचा पाणी वापर व जलाशयाच्या खालील बाजूचा पाणी वापर करण्याचे नियोजन केलेले आहे.

**जलाशयाच्या वरील बाजूचा पाणी वापर :** बाष्पीभवन २.६६ टीएमसी, जलाशय उपसा सिंचन १.७२, जलाशय बिगर सिंचन पिण्यासाठी ०.८३, जलाशय बिगर सिंचन औद्योगिक ०.५८, जलाशयातील गाळ २.२६, सीना माढा उपसा सिंचन योजना आवर्तन एक व दोन २.८४ टीएमसी, दहिगाव उपसा सिंचन योजना आवर्तन एक व दोन १.०३ टीएमसी असा एकूण ११.९२ टीएमसी पाणी वापराचे नियोजन दिनांक २ नोव्हेंबर २०२३ ते २९ फेब्रुवारी २०२४ या कालावधी केले आहे.

**सोलापूरचे नियोजन :** भीमा नदी आवर्तन (सोलापूर शहरासाठी) १ डिसेंबर २०२३ ते १० डिसेंबर २०२३ या कालावधीत ५ टीएमसी तर भीमा नदी आवर्तन (सोलापूर शहरासाठी हिळ्ळी कोल्हापूर पद्धतीचा बंधाऱ्यापर्यंत १ फेब्रुवारी २०२४ ते १० फेब्रुवारी २०२४ या कालावधीत ६ टीएमसी पाणी सोडण्यात येणार आहे, असा एकूण ३२.३५ टीएमसी पाणी वापर खालील बाजूचा होणार असून जलाशयाच्या वरील व खालील बाजूचा एकूण रब्बी हंगाम पाणी वापर ४४.२७ टीएमसी असा राहील

## १५२ ग्रा.पं.साठी उद्या मतदान; प्रचाराचा धुराळा संपला

### ४८३ पैकी ७४ संवेदनशील मतदान केंद्रे

सुराज्य/सोलापूर

जिल्ह्यातील १०९ ग्रामपंचायतींमध्ये सार्वत्रिक तसेच ४३ ग्रामपंचायतींमध्ये पोटनिवडणूकीचा प्रचार संपला आहे. ५ नोव्हेंबर मतदान होणार आहे. प्रशासनाची तयारी पुर्ण झाली आहे. ४८३ मतदान केंद्र आहेत. यापैकी संवेदनशील ७४ मतदान केंद्रांवर पोलिसांचा मोठा बंदोबस्त ठेवण्यात आला असल्याची माहिती निवडणूक कार्यालयाकडून देण्यात आली.



सर्वाधिक संवेदनशील मतदान केंद्रे मंगळवेढा आणि माळशिरस तालुक्यात आहेत. मंगळवेढा तालुक्यात २४ केंद्रे तर माळशिरसमध्ये २२ संवेदनशील मतदान केंद्रे आहेत. पंढरपूर आणि माढामध्ये प्रत्येकी ८ केंद्रे, मोहोळमध्ये ४ तसेच बार्शी तालुक्यात ३ संवेदनशील मतदान केंद्रे आहेत.मंगळवेढ्यात ९४ मतदान केंद्रे आहेत. ९४ मतदान केंद्रांवर ११० मतदान केंद्राध्यक्षांची नियुक्ती करण्यात आली आहे. करमाळ्यात ८८ झाली आहे. माढ्यात ८० केंद्रांवर ९० केंद्रांवर ९८ केंद्राध्यक्षांची नियुक्ती केंद्राध्यक्ष, अक्कलकोटमध्ये ६४ मतदान केंद्रांवर ८० केंद्राध्यक्ष, सांगोल्यात २१ केंद्रांवर २५ केंद्राध्यक्ष, दक्षिण सोलापूरमध्ये ३७ केंद्रांवर ४१ केंद्राध्यक्ष, पंढरपूरमध्ये ९ केंद्रांवर १४ तर मोहोळमध्ये १० केंद्रांवर २० केंद्राध्यक्षांची नियुक्ती करण्यात आली आहे.करण्यात आली आहे. तसेच २ हजार ३१२ अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.तर मतदानासाठी जिल्ह्यातील ४८३ मतदान केंद्रांवर केंद्राध्यक्षांची नियुक्ती केली आहे.


**१ हजार ८० सदस्यांसाठी निवडणूक लागली**

सोलापूर जिल्ह्यातील १०९ ग्रामपंचायतीमधील एक हजार ८० सदस्य आणि सरपंचपदासाठी निवडणूक लागली होती काही सरपंच तर काही सदस्यांच्या जागा बिनविरोध झाल्या आहेत. उर्वरित जागासाठी मतदान रविवारी होणार आहे. सकाळी ७.३० ते ५.३० या वेळेत मतदान होणार आहे. १०९ ग्रामपंचायती मधिल प्रचाराचा धुराळा आज संपला आहे.मतदान प्रक्रियेची जय्यत तयारी सोलापूर जिल्हाप्रशासनाकडून करण्यात आली आहे.

## पार्क स्टेडियमसमोर इसमाचा निर्घृण खून

सुराज्य/सोलापूर

पार्क स्टेडियमच्या फाटकासमोर सावजी हॉटेलजवळ एका इसमाच्या डोक्यावर प्रहार करुन त्याचा निर्घृण खून केल्याची घटना घडली. सकाळी साडेसातच्या सुमारास हा प्रकार घडल्याने खळबळ उडाली आहे.



राजू कोंडिबा बंडगर (वय-५०,चिंचनगर, निराळेवस्ती) असे मरण पावलेल्या व्यक्तीचे नाव आहे. शुक्रवारी सकाळी राजू बंडगर हे पार्क स्टेडियमसमोरुन जात असताना अज्ञात इसमाने त्यांच्या डोक्यावर अज्ञात वस्तूने प्रहार केला. त्यात रक्तबंबाळ होऊन ते जमिनीवर कोसळले.त्यात ते गंभीर जखमी झाले.काही वेळातच हल्लेखोर तेथून पसार झाले. त्यांच्यावर हल्ला कोणी व कशासाठी केला हे समजू शकले नाही.या घटनेची माहिती मिळाल्यानंतर फौजदार चावडी पोलिसांनी तातडीने तेथे धाव घेऊन बंडगर यांना उपचारास शासकीय रुग्णालयात दाखल केले, परंतु उपचार चालू असताना त्यांचा मृत्यू झाला. याची माहिती त्यांच्या कुटुंबियांनी समजल्यानंतर त्यांनी शासकीय रुग्णालयात धाव घेतली. याप्रकरणी त्यांचा मुलगा धीरज बंडगर (वय २४) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात इसमाविरुध्द फौजदार चावडी पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे.

पोलिसांनी घटनास्थळासह परिसराचे फूटेज तपासले असून, आरोपीचा शोध सुरु आहेत. संशयास्पद हालचाली फुटेजच्या माध्यमातून कैद झाल्या असून, लवकरच आरोपी हाती लागतील, असे पोलिसांनी सांगितले. तपास सहायक पोलीस निरीक्षक बनसवडे हे करीत आहेत.

## सणासुदीच्या काळात सोने दरात वाढ

**सोलापूर** : सणासुदीच्या काळात दागिन्यांच्या दुकानात मोठी गर्दी दिसून येते. धनत्रयोदिवशी सोनं खरेदी करणे खूप शुभ मानले जाते. दरम्यान, जर तुम्ही आज सोने-चांदी खरेदी करण्याचा विचार करत असाल, तर ही बातमी तुमच्यासाठी महत्वाची आहे. कारण आज सोन्याच्या दरात थोडी वाढ झाली आहे. तर वायदा बाजारात आज चांदीच्या दरात घसरण झाली आहे.

## एसटी बसचे तिकीट महागले

**मुंबई** : दिवाळी सुट्टीत एसटीने प्रवास करण्याचे नियोजन करणाऱ्या प्रवाशांना आता अधिक खिसा रिकामा करावा लागणार आहे. एसटी महामंडळाने सर्व प्रकाराच्या एसटी गाड्यांमध्ये सरसकट १०७ भाडेवाढ करण्याचा निर्णय घेतला आहे.



८ नोव्हेंबरपासून ही दरवाढ लागू होणार आहे. यंदा ७ नोव्हेंबरच्या मध्यरात्रीपासून अर्थात ८ नोव्हेंबर ते २७ नोव्हेंबरदरम्यान एसटीच्या सर्व बसश्रेणींमध्ये १०७ भाडेवाढ लागू करण्यात येत आहे. २८ नोव्हेंबरनंतर मुळ दराने तिकिट आकारणी सुरू होणार आहे. आरक्षित तिकिटाने प्रवास करणाऱ्या प्रवाशांना वाढीव भाडेदरातील फरकाचे पैसे प्रवास करताना द्यावे लागणार आहेत, अशी माहिती एसटी महामंडळाने दिली आहे.

## व्यापाऱ्यांची फसवणूक; सराईत गुन्हेगारास अटक

सुराज्य/सोलापूर


तोतयागिरी करुन व्यापाऱ्यांची फसवणूक करणाऱ्या सराईत गुन्हेगारास, शहर गुन्हे शाखेकडून अटक करण्यात आले आहे. सरबजितसिंग हरजितसिंग होरा (वय-३५, रा.अल्कसा सोसायटी, हडपसर) असे त्या गुन्हेगाराचे नाव आहे. त्याच्याकडून सव्वा आठ लाखांचा माल हस्तगत करण्यात आला आहे. २ मार्च २०२३ रोजी प्रकाश भारतभूषण आरशीद (रा.पूर्व मंगळवार पेठ,सोलापूर) यांना एका अज्ञात इसमाने मोबाईलद्वारे संपर्क करून त्यास धार्मिक कार्यासाठी, सोयाबीन तेलाचे १५० बॉक्स पाहिजे असल्याबाबत सांगितले.

**सव्वाआठ लाखांचा माल हस्तगत**

संबंधीत इसमाने त्या तेलाच्या खरेदीपोटी प्रकाश यांना चेक दिला.मात्र तो चेक वटला नाही. त्यानंतर प्रकाश यांनी संबंधीत इसमास फोन केला असता,त्याचा फोन बंद असल्याचे आढळुन आले. त्यानंतर दुसऱ्यांदासुद्धा त्याच पद्धतीने त्याने फसवणूक केली. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी याबाबत जेलरोड पोलीस ठाणे येथे तक्रार दिली व गुन्हा दाखल करण्यात आला. या गुन्ह्याचा तपास करत असताना एक इसम अंत्रोळीकर नगर गुरुद्वारा जवळ चार चाकीसह थांबल्याचे दिसले. पोलिसांनी त्या ठिकाणी साफळा रचून ताब्यात घेतले व अधिक चौकशी केली असता त्यांनी आपले नाव सरबजितसिंग हरजितसिंग होरा असे सांगितले. त्याच्याकडून चारचाकी वाहनसाह सुमारे ८ लाख २५ हजार ३५ रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. होरा यांनी चार ते पाच ठिकाणी व्यापाऱ्यांची फसवणुक केल्याचे निष्पन्न झाले आहे.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



पाच किलो? अर्धा तोळा म्हणाले तरी यांना घाम फुटतो !

| कल्याण |
| --- |
| 167-41-380 |

| मुंबई |
| --- |
| 138-28-279 |

## सरकार ॲक्शन मोडवर; सर्वपक्षीय ठरावासाठी धावपळ

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**मराठा आरक्षणाच्या बाबतीत सरकारने पाऊल टाकायला सुरूवात केल्याचे दिसून येत आहे. पुढच्या महिन्यात उपराजधानी नागपूर येथे होणाऱ्या हिवाळी अधिवेशनाच्या दुसऱ्याच दिवशी, ८ डिसेंबर रोजी मराठा आरक्षणाबाबत सर्वपक्षीय ठराव मांडण्याची तयारी सरकारने सुरू केली आहे.त्याच दिवशी नेमका फॉर्म्युला येथे जाहीर होण्याचे संकेत आहेत. आरक्षणाचा तिढा कायम असल्याने तो सुटणार कसा? हा एक गंभीर प्रश्न समोर आला आहे. त्यामुळे सरकार यातून कसा मार्ग काढते, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष आता नागपूरकडे लागले आहे.**




मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे यांनी जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी येथे प्राणांतिक उपोषण सुरू केले होते. त्यांच्या आंदोलनाचा हा दुसरा टप्पा होता. उपोषणाच्या समर्थनार्थ नागपूरसह राज्यात ठिकठिकाणी आंदोलन सुरू झाले. अनेक भागांत परिस्थिती चिघळली. आरक्षणाच्या मुद्द्यावर सरकारने विशेष अधिवेशन घ्यावे, अशी भूमिका काँग्रेससह विरोधी पक्षाने घेतली होती. दोन दिवसांपूर्वी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत मुंबईत सर्वपक्षीय बैठक झाली. दुसरीकडे त्यांनी उपोषण मागे घ्यावे, यासाठी प्रयत्न सुरू होते. सरकारच्या प्रयत्नांना गुरुवारी सायंकाळी यश आले. मनोज जरांगे यांनी उपोषण घेताना सरकारला २ महिन्यांची म्हणजे येत्या २ जानेवारीपर्यंत मुदत दिली. यावेळी मंत्री धनंजय मुंडे यांनी ८ डिसेंबर रोजी अधिवेशनात ठराव मांडण्यात येणार असल्याचे आश्वासन दिले आहे.

या पार्श्वभूमीवर नागपुरात ७ डिसेंबरपासून अधिवेशन सुरू होणार आहे. दुसऱ्याच दिवशी, शुक्रवारी ठराव येईल. आरक्षणातील विविध अडचणी लक्षात घेता, ठरावात कोणता फॉर्म्युला राहील, याची उत्सुकता केवळ राजकीय वर्तुळालाच नव्हे तर, सामाजिक चळवळीतील कार्यकर्त्यांनाही लागली आहे. सरकारकडे एक महिना आहे. या दरम्यान, वैध व तांत्रिक बाबी तपासून काम सुरू होईल, असे सूत्रांनी सांगितले.

### राऊत यांचे भाकीत



आमदार अपात्रतेप्रकरणी विधानसभा अध्यक्ष ३१ डिसेंबर रोजी सुनावणी घेणार असून यावेळी राज्यातले घटनाबाह्य सरकार पडेल, असे भाकीत खासदार संजय राऊत यांनी वर्तवले आहे. सरकार कोसळण्याआधी आरक्षण घेण्यासाठी जरांगे पाटलांनी २४ डिसेंबर ही तारीख दिली आहे. पाटलांनी २४ डिसेंबर, तर राज्य सरकारने २ जानेवारीची मुदत दिली आहे. पण, ३१ डिसेंबरला राज्यातले घटनाबाह्य सरकार जाणार आहे, म्हणून त्यांनी जरांगे पाटलांना २ जानेवारी ही तारीख दिली आहे, असे राऊतांनी म्हटले आहे.

### जिल्हाधिकाऱ्यांना दिल्या सूचना...

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शुक्रवारी राज्यातील जिल्हाधिकाऱ्यांची ऑनलाईन बैठक घेतली. मराठवाड्यात १ कोटी ७३ लाख कुणबी नोंदींची पडताळणी होत असेल तर काम अवघड नाही. त्यामुळे नोंदी तपासण्यात हयगय होता कामा नये. एक महिना ड्राईव्ह मोडमध्ये काम करा,अशी सूचना शिंदे यांनी केली. सरकारने शब्द दिला आहे तो पूर्ण करायचा आहे. त्यामुळे आपल्याला कारणं सांगता येणार नाही. या कामात हयगय खपवून घेतली जाणार नाही. शिंदे समितीच्या कामाचे काटेकोर पालन करा. पडताळणीच्या कामासाठी स्वतंत्र कक्ष स्थापन करा. मराठवाड्यात अवलंब केलेली कार्यपद्धती अन्य विभागांशी शेअर करा. त्यामुळे कामात पारदर्शकता राहील. लोकांनाही कळेल सरकार काय काय करतेय, असे शिंदे म्हणाले.